। न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।

# छत्रपती शिवाजी शिक्षण मंडळ ,संचलित

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज

ता.खटाव जि .सातारा



## शैक्षणिक वर्ष - 2019-20

पर्यावरण अभ्यास विभाग

# पशुपालन संपत्ती

पर्यवेक्षक- प्रा. डॉ. गिरे एस. एम.

Scanned with CamScanner

# कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज



## पर्यावरणशास्त्र  अभ्यास विभाग

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणपत्र देण्यात येते की,

1. दुबळे श्रद्धा शहाजी
2. गायकवाड प्रतिक्षा सयाजी
3. घाडगे शिवानी बाळू
4. गोडसे अनिकेत जयवंत

28/30

यांनी पशुपालन संपत्ती हा प्रकल्प शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अभ्यासक्रमानुसार B.A. II पर्यावरण अभ्यास या विषयासाठी केलेला आहे क्षेत्रिय प्रकल्प माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला आहे.

पर्यवेक्षक — Dr. Uire S.M.

प्राचार्य

I/c Principal
Arts & Commerce College
Vaduj (Satara)

# अनुक्रमणिका


| अ.नं. | तपशील |
|---|---|
| | मुखपृष्ठ<br>प्रमाणपत्र<br>प्रतिज्ञापत्र<br>आभार |
| 1 | अनुक्रमणिका<br>ओळख व कार्यपद्धती<br>* प्रस्तावना<br>* विषय निवडीची कारणे<br>* उद्देश<br>* गृहितके<br>* माहिती संकलनाच्या पद्धती |
| 2 | अहवाल<br>* निवडलेल्या घटकाचे महत्त्व |
| 3 | पशुपालन : एक फायदेशीर व्यवसाय<br>* पशुपालन व्यवसायाचे महत्त्व अभ्यासणे<br>* पशुपालन व्यवसायासाठी आवश्यक साधनांचा अभ्यास करणे<br>* पशुपालनावर नैसर्गिक स्थितीचा नैसर्गिक परिणाम अभ्यासणे<br>* पशुपालनातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास करणे<br>* पशुपालनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे<br>* पशुपालन हा व्यवसाय फायदेशीर आहे कि नाही हे अभ्यासणे<br>* पशुंसाठी देण्यात येणाऱ्या लसीकरणाचा अभ्यास करणे<br>* पशूंपासून मिळणाऱ्या दुग्ध उत्पादनाचा अभ्यास करणे |
| 4 | सारांश व निष्कर्ष<br>* सारांश<br>* निष्कर्ष |
| 5 | संदर्भ ग्रंथ सूची |


Scanned with CamScanner

प्रकरण – १

# ओळख व कार्यपद्धती

## १.१ प्रस्तावना

पर्यावरणातील ज्या घटकांमुळे मानवी गरजांची पूर्तता होते तसेच ते घटक राहणीमान सुधारण्यास मदत करतात त्यांना साधन संपत्ती असे म्हणतात. कोणत्याही देशाची प्रगती संसाधनाचा दर्जा आणि प्रमाण यांवर अवलंबून असते. परंतू गेल्या काही वर्षात वाढते औद्योगिकरण, कारखानदारी, नागरीकरण यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीचा ऱ्हास होतो. सतत वाढणारी लोकसंख्या आणि मर्यादित प्रमाणात नैसर्गिक संसाधने निर्माण झाल्यामुळे मानवाने शेती या व्यवसायाबरोबरच पशूपालनास सुरुवात केली.

भारतामध्ये पशूपालन हे शेतीच्या प्रमुख धंद्याला पूरक म्हणून वर्षानुवर्षे केले जात आहे. त्यामुळे तेथे गुरांचे प्रजनन हे दुग्धोत्पादन व शेतीच्या कामासाठी व शेती उपयुक्त बैलांची निपज अशा दुहेरी हेतूने केले गेले. व दुग्धोत्पादनाकडे फारसे लक्ष पुरविण्यात आले नाही. त्यातच प्रतिकूल हवामान चारा व खुराक यांची कमतरता एकरी जास्त असलेली जनावरांची व माणसांची संख्या यामुळे पशूपालन प्रगत झाले नाही. वर्षाला प्रत्येक मेंढीपासून मिळणारी लोकर ७०० कि.ग्रॅ व कोंबडीपासून मिळणारी अंडी (५० ते ६०) यावरुन हे सहज लक्षात येते. भारतातील पशूंच्या संख्येच्या मानाने पशूंपासून मिळणारे उत्पन्न इतर देशांच्या तुलनेने कमी आहे.

१९६१ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार देशातील एकूण उत्पन्नाच्या १९.८३% व एकूण शेतीच्या उत्पन्नाच्या १८.३ % आहे. डेन्मार्क मध्ये पशूधनापासून मिळणारे उत्पन्न ८१% व आर्यलँड मध्ये ७९% तर नॉर्वे व ब्रिटन यांचे ७८% आहे. भारतामध्ये शेतीची कामे अद्याप बहुतांशी बैल व काही भागात रेडे यांच्या सहाय्याने केली जातात. या कामाची किंमत करणे

Scanned with CamScanner

कठीण असले तरी एका अंदाजाप्रमाणे या कामाचे मोल ३०० ते ५०० कोटी रूपये असते.

पशूपासून मिळणाऱ्या २० प्रकारच्या पदार्थांची निर्यात केली जाते व त्यापासून ४८ कोटी रुपयांचे परकीय चलन उपलब्ध होते. वरील सर्व आकडेवारी १९६० ते ६१ या वर्षाचे आहेत. त्यानंतरच्या काळातील पशूसंवर्धनाच्या क्षेत्रातील प्रगती लक्षात घेता देशाच्या अर्थकारणात पशूंमुळे मिळणाऱ्या उत्पन्नाचा वाटा बराच मोठा असावा, असे दिसून येते. त्यामुळे आम्ही पशूपालन एक फायदेशीर व्यवसाय या विषयाची निवड केली.

## १.२ विषय निवडीची कारणे :-

१) पशुपालन हा व्यवसाय शेतीला पूरक व्यवसाय आहे.

२) पशूपालन हा व्यवसाय आर्थिक उत्पादन मिळवून देणारा व्यवसाय आहे.

३) पशूपालन व्यवसायाविषयी समाजात जनजागृती करण्यासाठी.

४) पशूपालनातून निर्माण होणाऱ्या पर्यावरण प्रदूषणाचा अभ्यास करण्यासाठी.

५) पशूपालनाचे महत्व व उपयुक्तता जाणून घेणे.

६) पशूपालनातील विविध जातीचा अभ्यास करण्यासाठी.

Scanned with CamScanner

१) पशूपालन व्यवसायाचे महत्व अभ्यासणे.

२) पशूपालन व्यवसायासाठी आवश्यक साधनांचा अभ्यास करणे.

३) पशूपालन नैसर्गिक परिस्थितीचा होणारा परिणाम अभ्यासणे.

४) पशूपालनपासून मिळणाऱ्या उत्पादनाचा अभ्यास करणे.

५) पशूपालनाचा पर्यावरणावर होणारा परिणाम अभ्यासणे.

६) पशूपालन हा व्यवसाय फायदेशीर आहे किंवा नाही याचा अभ्यास करणे.

७) पशूंसाठी देण्यात येणाऱ्या लसीकरणाचा अभ्यास करणे.

८) पशूंपासून मिळणाऱ्या दूग्धउत्पादनाचा अभ्यास करणे.

Scanned with CamScanner

## १.३ गृहीतके :-

१) पशूंसाठी विशिष्ट घरांची, गोठ्यांची आवश्यकता असते.

२) पशूंना विशिष्ट खाद्याची आवश्यकता असते.

३) पशूंना लसीकरणाची आवश्यकता असते.

४) पशूपालन व्यवसाय फायदेशीर आहे.

५) पशूपालनाविषयी लोकांमध्ये जनजागृती कमी आहे.

६) दुग्धव्यवसाय हा अत्यंत फायदेशीर व्यवसाय आहे.

७) पशूपालन व्यवसायातून विशिष्ट मोठ्या प्रमाणात आर्थिक प्राप्ती होते.

८) पशूपालन व्यवसायासाठी विशिष्ट हवामानाची गरज असते.

९) पशूपालन व्यवसायासाठी मोठ्या भांडवलाची आवश्यकता असते.

१०) पशूपालन व्यवसायासाठी भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

Scanned with CamScanner

## १.५ माहिती संकलनाच्या पद्धती :-

१) प्राथमिक आकडेवारी

अ) प्रश्नावली

२) दुय्यम आकडेवारी

अ) मासिके - ॲग्रोवन, पशूधन

ब) पाठ्यपुस्तक - इ. १० वी भूगोल : मानवी पर्यावरण.

क) मराठी विश्वकोष : खंड ९

ड) वर्तमानपत्रे - पुढारी, सकाळ इ.

पशुपालन एक फायदेशीर व्यवसाय या प्रकल्प अहवालासाठी आम्ही तीस प्रश्नांची प्रश्नावली तयार करून श्री.दिपक प्रभाकर यादव यांचा वेळ काढून मुलाखत घेतली. परंतु आम्हाला पुरेशी माहिती मिळाली नाही. म्हणून वरील दुय्यम आकडेवारीचा वापर केला.

Scanned with CamScanner

प्रश्नावली :-

१) तुमचे नाव काय आहे ?

२) तुमचे शिक्षण किती झालेले आहे ?

३) तुम्ही कोणता व्यवसाय करता ?

४) तुमच्या घरी पाळीव पशू आहेत का ?

५) पाळीव पशू असतील तर कोणकोणते आहेत ?

६) त्यातील प्रत्येक पशूंची संख्या किती आहे ?

७) दूध देणाऱ्या जनावरांची संख्या किती आहे ?

८) एका गाई व म्हैशीपासून एका महिन्यात किती दूध मिळते ?

९) दूधाला प्रतिलिटर मागे किती दर दिला जातो ?

१०) एका गाई, म्हैशी व बैलापासून किती टेलर खत मिळते ?

११) सर्वसाधारणपणे एका गाई व म्हैशीपासून वार्षिक उत्पन्न किती मिळते ?

१२) सर्वसाधारण एका बैलांपासून वार्षिक उत्पन्न किती मिळते ?

१३) एका मेंढीपासून किती किलो लोकर मिळते ?

१४) एका कोंबडीपासून किती किलो मांस मिळते ?

१५) एका बकरीपासून किती किलो मांस मिळते ?

१६) तुमच्या गावात पशूवैद्यकीय दवाखाना आहे का?

१७) तुम्ही पाळीव पशूंना वेळच्या वेळी चारा - पाणी देता का ?

१८) सर्वसाधारणपणे एका गाईला, म्हैशीला किंवा बैलाला एका महिन्यात किती शेकडा वैरण लागेल ?

१९) पशूंना होणाऱ्या रोगांवर लसीकरणाची सोय आहे का ?

२०) जनावरे आजारी झाल्यावर योग्य प्रकारे औषधोपचार करता का ?

२१) पशूंची विष्ठा व मलमूत्र यांची विल्हेवाट कशा प्रकारे लावता ?

Scanned with CamScanner

२२) जनावरांची राहण्याची सोय किंवा गोठा चांगला आहे का ?

२३) गोठा वेळच्या वेळी रोज साफ करता का ?

२४) गोठ्याची दिशा कशी असावी ?

२५) पशूपालनामुळे पर्यावरणावर कोणते दुष्परीणाम घडून येतो ?

२६) पशूपालनामुळे हवा प्रदूषणावर कसा परिणाम घडून येतो ?

२७) पर्यावरणाचा पशूपालनावर परिणाम घडून येतो का ?

२८) पशूपालनाने होणारे प्रदूषण कशा प्रकारे कमी करता येईल ?

२९) पशूपालन केल्याने आर्थिक लाभ होतो का?

३०) पशूपालन हा व्यवसाय फायदेशीर आहे का ?

Scanned with CamScanner

## २.६ निवडलेल्या घटकांचे महत्व

भारत हा कृषीप्रधान देश आहे. यातील लोकसंख्या ही जास्तीत जास्त प्रमाणात शेती हा व्यवसाय करते पण भारतातील शेती ही मान्सूनवर अवलंबून आहे. आणि मान्सून हा अनियमित स्वरूपाचा असल्याने शेतीत जास्त उत्पादन मिळू शकेलच असे नाही. त्यासाठी शेतीला जोडव्यवसाय म्हणून काही ना काही करत असतो. उदा. कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय, मेंढी पालन, शेळीपालन, इमूपालन इ.

या व्यवसायांमधील पशूपालन हा व्यवसाय कमी खर्चाचा व जास्त उत्पादन मिळवून देणारा व्यवसाय आहे. हा व्यवसाय शेती करत करत करता येतो. त्यासाठी आवश्यक असणारे हे खाद्य शेतीतुनच प्राप्त होत असते व यांच्यापासून पर्यावरणाला जास्त धोका पोहचत नाही.

पशूपालन व्यवसायातून पशूपासून आवश्यक असे खत शेतीसाठी प्राप्त होत असते. तसेच पशूपासून मानवाला दुध, मांस, अंडी इ. आहार मिळत असतो. तर लोकर, कातडी हे सुद्धा मिळत असते. त्यापासून मनुष्याची आर्थिक परिस्थिती सुधारते. त्यामुळे शेतीत उत्पादन जरी पुरेसे मिळाले नाहीतरी या व्यवसायातून तो त्याचा उदरनिर्वाह करू शकतो.

पशूंची भारतातील आकडेवारी :-

भारतात १९६९-७० च्या अहवालानुसार पाळीव पशूंची संख्या पुढीलप्रमाणे :

गायी १७, ६४,५०,००० ; म्हैशी ५,४२,००,०००, मेंढ्या ४,२६,००,००० शेळ्या ६,७५,०००,०० गाढवे १०,००,०००, उंट ११,२०,०००, कोंबड्या १,११,७९,५३६ प्रति १०० हेक्टर जमिनीमागे पाळीव पशूंची संख्या ही पुढीलप्रमाणे.

गायी गुरे ४८, म्हैशी ११, मेंढ्या ७, शेळ्या ११, कोंबड्या ७५.

अशा प्रकारे पाळीव पशूंची भारतातील आकडेवारी दर्शविली आहे.

Scanned with CamScanner

# ३.५ अहवाल

### १ ) पशूपालनाचे महत्व / पशूपालन म्हणजे काय ?

उत्पादनशील पाळीव प्राण्यांची उत्पादन क्षमता किंवा उपयुक्तता वाढविण्याच्या दृष्टीकोनातून त्यांचे प्रजनन व पालनपोषण करणे हा पशूसंवर्धनाचा, पशूपालनाचा खरा अर्थ आहे. केवळ त्यांची संख्या वाढविणे हे पशूपालन नव्हे तर गायी, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या, गाढवे इ. यांचा पाळीव प्राण्यांच्यात समावेश होतो. या प्राण्यांची वेगवेगळी शरीररचना, शरीरक्रिया विज्ञान तसेच त्यांच्यापासून मिळणाऱ्या पदार्थांचे उत्पादन लक्षात घेताच त्याच्या शरीर पोषणाच्या व रोगाच्या समस्या भिन्न आहेत हे उघडच आहे. जगाच्या विविध भागातील हवामानातील बदल व त्याच्या या प्राण्यांच्या क्रियाशीलतेवर म्हणजे उत्पादनावर होणारा परिणाम, अनुवंशिकतेमुळे प्रजेमध्ये दिसून येणारा गुणधर्म इत्यादी अनेक बाबतींचा विचार करता पशूसंवर्धन हा विषय किती व्यापक आहे हे सहजच लक्षात येते.

### २ ) पशूंसाठी राहण्यासाठी घर किंवा गोठा कशा प्रकारे असावा ?

जनावरांना म्हणजेच पशूंना राहण्यासाठी गोठा हा दक्षिण ते उत्तरेकडे तोंड करून असावा. कारण पुरेसा सुर्यप्रकाश मिळण्यासाठी आणि सर्व गोठ्यात हवा खेळती राहण्यासाठी आणि त्याचबरोबर गोठ्यामध्ये असणारी गवाणी १ ते १.५ फूट असावी आणि बसण्यासाठी खाली बडवलेला कोबा असावा की जेणेकरून जनावरांना सपाट जागी व्यवस्थित बसता यावे आणि गोठा व्यवस्थित साफ करता येण्यासाठी गोठा चांगल्या पद्धतीने असावा.

Scanned with CamScanner

### ३ ) पशुंना आवश्यक असणारे खाद्य -

पशूंना वेळोवेळी चारा - पाणी द्यावा त्याचबरोबर त्यांना आवश्यक ते खाद्य द्यावे.

पशूंना एका दिवसात किती वैरण द्यावी त्याचा तपशील खालीलप्रमाणे...

| प्राणी | वेळ | वैरण/ चारा (किलो प्रमाणात) |
|---|---|---|
| म्हैस | २४ तास | १० किलो |
| गाय | २४ तास | ८ किलो |
| बैल | २४ तास | १२ किलो |
| शेळी | २४ तास | ५ किलो |

### ४ ) दूध देणाऱ्या जनावरांसाठी कोणत्या प्रकारचे खाद्य दिले जाते ? -

दूध देणाऱ्या जनावरांसाठी सरकी पेंड, शिंगोळी पेंड, खपरी पेंड, गहू भुसा, मका भुसा, मिल्क मोर या प्रकारचे खाद्य दिले जाते.

खाली दिलेल्या तक्त्यानुसार प्रत्येक प्राण्यासाठी पेंड दिली जाते.

| प्राणी | दिले जाणारे खाद्य | प्रमाण | वेळ |
|---|---|---|---|
| म्हैस | शिंगोळी पेंड, मिल्कमोर | १ किलो / २ किलो | सकाळी व सायंकाळी |
| गाय | गहू भुसा, मिल्कमोर | १ किलो / १$^{१/२}$ किलो | सकाळी व सायंकाळी |
| बैल | मका भुसा | ०.५ किलो | सायंकाळी |

Scanned with CamScanner

### ५ ) पर्यावरणाचा पशुपालनावर होणारा परिणाम होतो का ? -

पर्यावरणाचा म्हणजेच निसर्गाचा पशुपालनावर मोठा परिणाम घडून येतो. पशुपालनात असणारे गोठे हे व्यवस्थित बांधले नसतील तर ते वादळी वाऱ्यात जोरदार पावसात पडतात. त्यांचे पत्रे उडून जातात, आणि भिंती कोसळल्या जाऊन जनावरे जखमी होतात, अगर मृत्यू पावतात.

पावसाळा ऋतूत जनावरांचे फार मोठी हानी होते. विजांच्या कडकडाटात त्याचबरोबर झाडाखाली बांधण्यात आलेल्या जनावरांवर वीज पडते. अशा प्रकारे आणि नदीला पूर आल्याने त्यामध्येही गुरे वाहून जातात. त्याचबरोबर आवर्षण आपत्ती असेल तर गुरे अन्नपाण्याविना आजारी पडून मृत पावतात.

### ६ ) पशुपालनाचा पर्यावरणावर कसा परिणाम घडून येतो ?

पशुपालन हा व्यवसाय सर्वत्र केला जातो. परंतु लोक पर्यावरण धोक्यात घालून हा व्यवसाय करतात. नदीच्या पात्रात गायी-म्हैशी धुतल्याने जलप्रदूषण होते. मृत पशू उघड्यावर फेकल्याने सवत्र दुर्गंधी पसरून हवा प्रदूषित होते आणि त्यांचे शरीर मातीत कुजल्याने मृदा प्रदूषित होते. शेळीसारख्या पशुमुळे वनस्पतींचा शेंडा खाल्ला जातो. त्यामुळे वृक्षाची, वनस्पतीची वाढ खुंटते. त्याचबरोबर त्यांचे मलमूत्र यांची विल्लेवाट वेळचेवेळी लावली नाही तर छोटेमोठे सूक्ष्म जीव व जंतुंमुळे रोग पसरतात. उदा. कॉलरा, मलेरिया.

Scanned with CamScanner

**७ ) पशूंचे / जनावरांची धार काढण्यासाठी काय करता ? -**

ज़नावरांची धार काढते वेळी कोणती काळजी घेता ?

जनावरांची धार काढतेवेळी मोसंबी, संत्री या फळांची वाळलेली साल असते, त्या सालीचा जाळ करून धूर करावा. त्यामुळे डास वगैरे जनावरांना चावत नाहीत. आणि दूध काढताना पाय उचलत नाहीत. त्याचबरोबर वेळचेवेळी रोज गोठा स्वच्छ करावा.

**८ ) दूध देणाऱ्या जनावरांवर संगीताचा / गाण्याचा परिणाम होतो काय ?**

संगीत ऐकण्यासाठी एक वेगळ्या प्रकारची स्थिती असावी लागते. म्हणजेच जनावरे आजारी असतील तर त्यांना त्रास होतो. म्हणून ते दूध कमी देतात. परंतु एकसारखे संगीत ऐकताना जनावरे दूध जास्त देतात. ते शांत अवस्थेत संगीत ऐकतात. आणि जास्त प्रमाणात दूध देतात.

**९ ) जनावरांना कोणकोणते रोग होऊ शकतात ?**

जनावरांना फऱ्या, एफएमडी, निमोनिया, मट्टडिसा, पोटफुगी, डिसेंट्री, घटस्पर्श, आत्रविषार, बुळकुंडी, रेबीज, डिस्पेंटर, मानमोडी, धनुर्वात, देवी, क्षयरोग, सरा, पांढरी हागवण, थायलेरीयासीस, वनर्जीत, खरूज, जंत, गोचिड, बेबीसीएसीस इत्यादी प्रकारचे रोग जनावरांना होत असतात.

**१० ) लसीकरण करतेवेळी कोणती काळजी घ्यावी ?**

कोणत्याही प्रकारच्या लसीकरणाचे महत्त्व हे लस टोचणाऱ्या पशुवैद्यकावर अवलंबून असते. लस देणाऱ्या वैद्यकाने पायात स्वच्छ गमबुट घालावेत. स्वच्छ पांढरेशुभ्र ॲपरन परिधान करावा. हात स्वच्छ धुवून त्यावर स्पिरिट चोळून निर्जंतुक करावे. लसिकरण करताना धुम्रपान करू नये. लसीकरणासाठी वापरात येणारी साधने - सुई, सिरींज काचपट्टी, चिमटा, इत्यादी साधने व्यवस्थित निर्जंतुक करावीत. प्रत्येक वर्षी जनावरांना लसीकरण करावे.

Scanned with CamScanner

११ ) जनावरांना लसीकरण करण्यासाठी पद्धत सांगा. -

| रोगाचे नाव | लस देण्याची पद्धत | ऋतू | रोगप्रतिबंधक टिकण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| फऱ्या | ५ मिली त्वचेखाली | हिवाळा पावसाळा | सहा महिने |
| घटस्पर्श | ३ मिली मांसात | उन्हाळा हिवाळा पावसाळा | एक वर्ष |
| फाशी / सड | ९ मिली त्वचेखाली | उन्हाळा हिवाळा पावसाळा | एक वर्ष |
| आत्तविषारी | ५ मिली त्वचेखाली | उन्हाळा हिवाळा पावसाळा | एक वर्ष |
| बुळकांडी | ९ मिली त्वचेखाली | उन्हाळा हिवाळा पावसाळा | एक वर्ष |
| लाळ | ५ मिली त्वचेखाली | हिवाळा पावसाळा | सहा महिने |

१२ ) लसीकरण वेळापत्रक कसे असावे? -

| रोगाचे नाव | मात्रा | हंगाम |
|---|---|---|
| लाळ / खुरकत | वर्षातून ३ वेळा | मार्च, जून, जुलै, डिसेंबर |
| बुळकांडी | वर्षातून १ वेळा | नोव्हेंबर, डिसेंबर |
| घटस्पर्श | वर्षातून १ वेळा | पावसाळ्यापूर्वी |

Scanned with CamScanner

१३) पशुपालनापासून कोणकोणती उत्पादने मिळतात ?

पशुपालन या व्यवसायामुळे मानवास उदरनिर्वाहाची दिशा सापडली. शेती हा व्यवसाय करत-करत जोडधंदा म्हणून पशुपालन केले जाते. पशुपालनामुळे मानवास पशुंपासून मिळणाऱ्या उत्पादनापासून सकस, पोषक असा आहार मिळतो. शेळी, मेंढी, डुक्कर यांच्या आतड्यापासून सॉसेज करिता आवरण मिळते.

पशुंच्या विष्ठेपासून जैविक खत शेतीसाठी मिळते. मेंढींपासून मोठ्या प्रमाणात लोकर मिळते. म्हैस, गाय व शेळी यांच्यापासून दूध हा उपयुक्त पदार्थ मिळतो की ज्यापासून अनेक पदार्थ बनविले जातात. त्याचबरोबर पशुंपासून चरबी मोठ्या प्रमाणात मिळते. आणि कोंबडीपासून आहारासाठी अंडी मिळतात.

१४) पशुपालन हा व्यवसाय फायदेशीर आहे किंवा नाही ?

पशुपालन हा व्यवसाय शेतीच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा आहे. कारण शेतीपासून सुद्धा पशुंना चारा, वैरण मिळत असते. त्यासाठी मोठ्या भांडवलाची गरज लागत नाही. फक्त दूध देणाऱ्या जनावरांसाठी दुधाचे फॅट वाढविण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारची खाद्ये विकत आणावी लागतात.

पशुंच्या खाद्याचा विचार केला असता त्यासाठी जेवढे भांडवल लागते, त्यापेक्षा जास्त भांडवल पशुपालनापासून मिळते. पशुंपासून मोठ्या प्रमाणात उत्पादने मिळतात. आणि त्या उत्पादनांना बाजारपेठेत मोठी मागणी आहे. आणि त्याचबरोबर दुधापासूनच्या उत्पादनाला ह्या बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी आहे. आणि त्यामुळे त्याला चांगला दर दिला जातो. पशुपालनामुळे चांगले उत्पन्न मिळते. त्यामुळे हा व्यवसाय फायदेशीर आहे.

Scanned with CamScanner

## ३.२ ) पशुपालनाचे उपयोग

१. शेळी, मेंढी व डुक्कर यांच्या आतड्यापासून सॉसेजकरिता आवरण व शस्त्रक्रियेनंतर शिवण्यासाठी वापरली जाणारी तात मिळते.

२. गुरांच्या शेपटीवरील व मानेवरील केसांपासून वेगवेगळे ब्रश तयार करतात.

३. हाडांची भुकटी पशुखाद्ये व खते यांमध्ये वापरली जाते.

४. पशुंपासून मिळणाऱ्या चरबीचा उपयोग साबण, मेणबत्त्या, विविध तऱ्हेची ग्रिजे, कापड उद्योग, सौंदर्य प्रसादने इत्यादी तयार करतात.

५. गुरांच्या गोठ्यातून मिळणाऱ्या शेण, चारा, मूत्र इत्यादी टाकाऊ पदार्थांपासून शेणखत तयार होते.

६. खतांसाठी शेतामध्ये मेंढ्या बसवितात.

७. शेणापासून गोबर वायू हा इंधन म्हणून उपयुक्त असणारा वायू तयार करता येतो.

८. म्हैस, गाय व शेळी पासून दूध हा उपयुक्त पदार्थ मिळतो.

९. खाटीकखाण्यात मारल्या जाणाऱ्या पशूंचे रक्त तसेच पोषक ग्रंथी, अवटू ग्रंथी, यकृत इत्यादींपासून औषधी द्रव्ये व हार्मोन मिळतात.

१०. मेंढ्यांपासून दूध आणि उबदार कपड्यांसाठी लोकर मिळते.

Scanned with CamScanner

## ३.३ ) पशुपालनाचे फायदे / तोटे

**फायदे -**

१. पशुपालनाने उदरनिर्वाहास मदत होते व आर्थिक लाभ मिळतो.

२. पशुपालनाने मानवास मांस, दूध, अंडी अशा प्रकारचा पोषक आहार मिळतो.

३. पशूंपासून शेतीसाठी उपयुक्त असे खत मिळते.

४. शेळी व मेंढीपासून लोकर मिळते.

५. मानवाच्या आर्थिक गरजा पूर्ण होतात.

**तोटे -**

१. जनावरांच्या मूत्रापासून अनेक सूक्ष्मजीवांची निर्माती होते व रोग पसरतात.
उदा. : मलेरिया कॉलरा.

२. जनावरांच्या शेणापासून बनविलेल्या गोवऱ्या इंधन म्हणून वापरल्याने हवाप्रदूषण होते.

३. कुरणांची संख्या कमी असल्याने गवतांचे आच्छादन नष्ट होऊन मृदाप्रदूषण होते.

४. जनावरे पाण्यात धुतल्यामुळे जलप्रदूषण होते.

५. मृत जनावरे उघड्यावर टाकल्यास दुर्गंधी पसरून हवा प्रदूषित होते.

६. शेळीसारख्या पशूंनी वनस्पतीचा फांदीचा भाग खाल्ला गेल्याने वनस्पतीची वाढ खुंटते.

Scanned with CamScanner

## ४.१ ) सारांश व निष्कर्ष

**सारांश -**

१. पशुपालन या व्यवसायाचे महत्त्व अभ्यासून पशुपालनासाठी आवश्यक गोष्टींचा अभ्यास केला.

२. पशुपालन या व्यवसायावरती नैसर्गिक आपत्तीचा -पूर, आवर्षण, पाऊस, वीज इत्यादीचा परिणाम होतो.

३. पशुपालनामुळे विष्टा, मलमूत्र यामुळे प्रदूषण होते, त्याचाही निसर्गावर परिणाम झालेला दिसून येतो.

४. पशुपालन या व्यवसायातून आर्थिक उत्पन्न चांगले मिळते.

५. पशुंपासून मिळणाऱ्या उत्पादनाचा उपयोगही मोठ्या प्रमाणात होतो. त्याचबरोबर त्यांच्या उपचाराच्या बाबतीत लसीकरण केंद्राची सोय, लसीकरण वेळापत्रक, लसीकरणाची पद्धत, इत्यादींचा अभ्यास केला आहे.

Scanned with CamScanner

निष्कर्ष -

१. कमीतकमी भांडवलात चांगल्या प्रकारचे उत्पन्न मिळते.

२. पशुपालनामुळे मिळणाऱ्या उत्पादनास बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

३. पशुपालन व्यवसायामुळे उदरनिर्वाह चांगल्या प्रकारे होतो.

४. पशुपालन हा व्यवसाय फायदेशीर व्यवसाय आहे.

Scanned with CamScanner

# प्रकरण ५

## ५.१ संदर्भ ग्रंथ सूची -


१. श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी : प्रथम प्रकाशन , १९८०

मराठी विश्वकोष खंड - ९

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य सांस्कृतीक मंडळ, पुणे.

२. डॉ. तानाजीराव निकम : द्वितीय आवृत्ती, २००५ पशुसंवर्धन

प्रकाशक - रामचंद्र दत्तात्रय पवार - अजिंक्यतारा पब्लिकेशन्स - ३८/६५६, टाटा कॉलनी, मुंबई, ४०० ०८१

३. डॉ. नितीन मार्कंडेय : प्रथम आवृत्ती, २००७

भूगोल : मानवी पर्यावरण

प्रकाशक - महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.


Scanned with CamScanner